भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

अध्याय सहावा , भाग दुसरा

सुलभ ओवीबद्ध रचना



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

साहित्य प्रतिष्ठान®

भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

अध्याय सहावा : भाग दुसरा

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)

२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com

ई प्रकाशन :

ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

E Sahity Pratishthan

Eleventh floor(G1102)

Eternity

Eastern Express Highway

Thane, Maharashtra. 400604

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख

©श्री विजय पांढरे(२०१२)

या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.

प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भेट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

नाकपुड्यातून वारा । जो जातसे अंगुळे बारा । तो गच्च धरुनी माघारा । आत घाली ॥२३६॥
ऐसे श्वास मंद होता । अपान ऊर्ध्वाची संपते भेदता । आणि चक्रांची गतिमानता । शांत होई ॥२३७॥
ऐसे प्राण अपान एक होणे । तेचि कुंडलिनीचे जागणे । जे श्वासप्रक्रियेचे थांबणे । जाण अर्जुना ॥२३८॥
मग जाणून पृथ्वी धातूस । करी तयाचाही एक घास । मग त्या जलतत्त्वास । संपवी ती ॥२३९॥
ऐसी खाता दोन भूते । तिचे समाधान होते । मग ती जाऊन रहाते । सुषुम्नेपाशी ॥२४०॥
तेथे तृप्तीच्या कारणे । तियेने गरळ जे ओकणे । तेच अर्जुना बा असणे । अमृताचे ॥२४१॥
तो अमृतअग्नी आतूनी निघता । प्रकटते आंतरिक शांतता । मग शरीराशी संबधता । तुटू लागे ॥२४२॥
नाड्यांचे प्रवाह थांबती । थांबे नववायूची ती गती । मग शरीराची जाणीव ती । राहेच ना ॥२४३॥
ऐसे रागद्वेष संपता । होते त्रिगुणाची सांगता । सहा चक्रे ती भेदता । प्रकटे मुक्ती ॥२४४॥
आता दोन्ही नाकपुड्यातून । संपे श्वासाचं येणं जाणं । तेच अहंभावाचं विरणं । जाण अर्जुना ॥२४५॥
बुद्धिची कळीका विरे । सुगंध जागीच उरे । मग शक्तीसर्व संचरे । सुषुम्नेमाजी ॥२४६॥
जैसे उताराचे कारणे । चंद्रामृताचे वाहणे । जसे ते कलंडणे । अमृत तळ्याचे ॥२४७॥
त्या अमृताकारणे । अहंकार तो संपणे । तेणे कारणे श्वासाचे थांबणे । जाण अर्जुना ॥२४८॥
जसे त्या मुशीत । धातूरस तो ओततात । मग धातूस आकार प्राप्त । मुशीचा जैसा ॥२४९॥
तैसे घेऊन पिंड आकार । अमृत होई साकार । जसे ते त्वचेचे पदर । घेतले अर्जुना ॥२५०॥
येता अभ्राचे आवरण । घडे सूर्यतेजाचं मंदावणं । परि दूर होता आवरण । प्रकटे तेज ॥२५१॥
त्वचा होता पहा कोरडी । झडून जाते जशी राखोडी । मग कोवळी कातडी । प्रकटे तेथे ॥२५२॥
जैसे स्फटिक ते स्वयंभ । का रत्नबीजा निघाले कोंभ । तैसे साधकाचे अंग । चमकते अर्जुना ॥२५३॥
जैसे संध्याकाळचे रंग । वाळवोनी बनवावे अंग । तैसे चैतन्याचे लिंग । प्रकटते तेथे ॥२५४॥
जैसे केशर तो भरीव । वा अमृतरस ओतीव । तैसे ते रूप घोटीव । शांतीचे अर्जुना ॥२५५॥
ते आनंदचित्राचे लेप । वा महासुखाचे रूप । कि संतोषाचे रोप । लावले जैसे ॥२५६॥
तेथे सोनचाफ्याची कळा । जैसा अमृताचा पुतळा । वाटे बहरला तो मळा । कोवळा अर्जुना ॥२५७॥
शरदाच्या निरभ्र आकाशात । चंद्रबिंब जसं तळपतं । तैसे हे तेज मूर्तिमंत । दिसे अर्जुना ॥२५८॥
तैसे हे शरीर होते । जेधवा कुंडलिनी प्रकटते । मग भीती यमासही वाटते । त्या सिद्धाची ॥२५९॥
मग वृद्धत्व ते ओसरते । नि तारुण्य ते उमटते । पुन्हा प्राप्त होते । बाल्यावस्था ॥२६०॥
वयाचा जरी लहान । परि समजेने अति महान । मनाने अति धैर्यवान । वृत्ती त्याची ॥२६१॥
सोन्याच्या त्या झाडास । लागावे रत्नांचे घोस । तशी नखे तयास । उगवती आता ॥२६२॥
दातही नवीन होती । तेजाने ते चमकती । अशी हिऱ्यांची पंक्ती । मुखी अर्जुना ॥२६३॥
दृष्टीने पाहू जाता । माणिक कणांशी साम्यता । तैसी सर्वांगी रोमरोमता । चमके अर्जुना ॥२६४॥
ऐसी होत करचरणतळे । जैसी उमलली कमळे । तेजाने झळकती डोळे । काय सांगू ॥२६५॥
जेधवा मोती परिपक्व होतो । शिंपलीत तो न मावतो । मग शिवण तो उकलतो । जशी शिंपलीची ॥२६६॥
तैसी दृष्टी न सामवून पापणीत । असे बाहेर ती निघू पाहत । बुबळे ती वरती जात । व्यापती गगना ॥२६७॥
देह भासे सोनियाचा । तरल जैसा वायूचा । जल पृथ्वी जडत्वाचा । अंश नाही ॥२६८॥
मग समुद्रापलीकडील देखतो । नि स्वर्गीचे नाद ऐकतो । मनोगतही ओळखतो । मुंगीचे तो ॥२६९॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

वायूच्या घोड्यावर बसतो । नि पाण्यावर तो चालतो । ऐशा सिद्धी तो पावतो । तेव्हा अर्जुना ॥२७०॥
ऐसे लक्ष्य करुनी पवना । मध्यमेचा चढून जिना । ऐक्य पावतो तो गगना । हृदयामाजी ॥२७१॥
तीच कुंडलिनी जगदंबा । जी परम चैतन्याची शोभा । जिने विश्वबीजाचिया कोंभा । सावली केली ॥२७२॥
शून्याचे जे गाव । जो परमात्मा शिव । तीच ओंकार नि प्रणव । जाण तू अर्जुना ॥२७३॥
ऐसी ती कुंडलिनी । प्रकटता हृदयस्थानी । तोच अनाहत ध्वनी । जाण तू अर्जुना ॥२७४॥
ऐसी कुंडलिनी शक्ती प्रकटता । चैतन्यच येते हाता । अर्जुना तीच रे वंदता । अनाहत ध्वनीची ॥२७५॥
जो स्वत:च शक्ती झाला । चैतन्यस्वरुपी विरला । तयानेच ऐकला । तो अनाहत ध्वनी ॥२७५॥
तो घोष ओंकाराचा । वा उल्लेख नाद चित्राचा । अनुभव जो प्रणवाचा । तो अनाहत ध्वनी ॥२७६॥
ऐसी अनुभूती अंतरी येणे । तेच कुंडलिनीचे जाणणे । हिचा अनुभव नसणे । ते अज्ञान अर्जुना ॥२७७॥
ध्यानी ठेव अर्जुना । जोवर नाश नाही श्वसना । तोवरीच मनाचा धिंगाणा । चालतो येथे ॥२७८॥
त्या अनाहताच्या ठिकाणे । चार वाचांचे संपणे । तेच ब्रह्ममयतेचे प्रकटणे । जाण अर्जुना ॥२७९॥
अस्तित्वाचे जे जन्मस्थान । तेच महदाकाशाचं असणं । जेथून हे चैतन्य । प्रकटते अर्जुना ॥२८०॥
ऐसी हृदयाच्या अंतरी । ती कुंडलिनी परमेश्वरी । जिला तेजाची शिदोरी । वर्णिती कोणी ॥२८१॥
बुद्धीचा घडता घास । प्रकटते ब्रह्म हमखास । द्वैताचा तो वास । नाही तेथे ॥२८२॥
पृथक अहंभाव संपता । ते चैतन्य येते हाता । चैतन्याची महत्ता । कैसी सांगू ॥२८३॥
पवनाच्या पुतळीने । सोनेरी वस्त्र पांघरणे । ते वस्त्र मग फेडणे । तैसेच ते ॥२८४॥
त्या वाऱ्याच्या कारणे । ज्योतीचे जसे विझणे । वा विद्युल्लतेचे ते लुप्त होणे । आकाशी जसे ॥२८५॥
जैसी हृदय कमळावरी । दिसे सोनियाची सरी । ती प्रकाशाची उजरी । प्रकटवी तेथे ॥२८६॥
ऐसी हृदय ठिकाणी । मूळ अस्तित्वाची कहाणी । होते सर्व शक्तींची आटणी । चैतन्या ठायी ॥२८७॥
ऐसे मूळ शक्तीचं अनुभवणं । जे केवळ चैतन्यच असणं । गुण आकाराचं भासणं । तेथे नाही ॥२८८॥
मनाच्या होता पार । वाचांचा संपता व्यवहार । मग प्रकटतो निराकार । नाही जैसा ॥२८९॥
कल्पनेच्या त्या क्षेत्रात । शक्ती कुंडलिनी नाही येत । ओलांडता ती महाभूत । अनुभूती तिची ॥२९०॥
करणे पिंडी पिंडाचा घास । तेचि नाथपंथाचे रहस्य । दर्शविले याच संकेतास । भगवंताने ॥२९१॥
संकेताचे सार जाणून । भावार्थाचे केले प्रकटन । रहस्य दाविले मी उलगडून । तुम्हांप्रति ॥२९२॥
कुंडलिनीची येता अनुभूती । योगी जगासी एकत्व पावती । पावने ऐसे एकत्व जगती । तेचि ज्ञान ॥२९३॥
एरवी शरीरधारी दिसतो । परि तो वेगळाच असतो । जसा वायूचा पुतळा तो । तैसा अर्जुना ॥२९४॥
जैसा केळीचा तो गाभा । सोपटे सांडूनि उभा । तैसे एकत्व पावून नभा । वावरे तो ॥२९५॥
तैसे तयाचे शरीर । जया म्हणताती खेचर । कैसा जाहला चमत्कार । पिंडी अर्जुना ॥२९६॥
ऐसी प्रकटता सिद्ध स्थिती । सिद्धी मागे मागे धावती । येई चमत्कारांची प्रचीती । तेथे अर्जुना ॥२९७॥
अर्जुना या सिद्धि गौण । आता ऐक लक्ष देऊन । तीन पंचभूता संपवून । तो वावरे देही ॥२९८॥
पृथ्वीते आप विरवी । आपाते तेज जिरवी । तेजाते पवनु हरवी । हृदयामाजी ॥२९९॥
पाठी आपण एकला । शरीररूपी जरी भासला । परि एकत्व तो पावला । आंतरगगनी ॥३००॥
ते वेळी कुंडलिनी हे भाष जाये । मारुत ऐसे नाम होये । परि शक्तीपण ते राहे । जोवरी न एकत्व शिवासी ॥३०१॥
मग जालंधर सांडी । ककारांत फोडी । गगनाचिये पहाडी । पैठी होय ॥३०२॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ते ओंकाराचिये पाठी । पाय देत उठाउठी । पश्यंतिचिये पाऊटी । मागे टाकी ॥३०३॥
मग तुर्येची येता बारी । महदाकाश प्रकटे अंतरी । एकरूप होते सागरी । नदी जैसी ॥३०४॥
मग ब्रह्मरंधी स्थिरावोनी । सोहंभावाच्या बाह्या पसरोनी । परमात्मलिंगा धावोनी । मिठे पडे ॥३०५॥
पंचमहाभूतांची होता आटणी । होते शिवशक्तीची मेळणी । मग एकरूपता आंतरगगनी । होय तेथे ॥३०६॥
मेघ होऊनि दूर गेला । नदी होऊनी सागरी आला । तैसे शिवशक्तीचा काला । झाला तेथे ॥३०७॥
जे गगनाचे प्रकटणे । तेच अहंपणाचे एक होणे । शिवशक्ती एकत्वाने । प्रकटे तेथे ॥३०८॥
द्वैताची ती कल्पना । मग तेथे उरेचना । जेव्हा आंतरगगना । झाली एकी ॥३०९॥
गगनी गगन लय होणे । तेच आत्मानुभूतीचे प्रकटणे । जे आपल्यासी आपण ओळखणे । ते ज्ञान अर्जुना ॥३१०॥
तेथली ती वार्ता । नच येई शब्दांच्या हाता । संवाद तो करू जाता । खोटाच होई ॥३११॥
अर्जुना एरवी तरी । जी उच्चाराचा गर्व धरी । ती वाणी जी वैखरी । ती अतिदूर अर्जुना ॥३१२॥
मध्यमेस दूर करून । पश्यंतीसही ओलांडून । तुर्या ती प्रकटून । गगना येते ॥३१३॥
ऐसे शब्द वाचांचे संपणे । तेचि पंचभूतांचे आटणे । जे आंतरगगनाचे प्रकटणे । ते ज्ञान अर्जुना ॥३१४॥
आता महाशून्याच्या डोही । जेथे गगनही आटून जाई । तेथे शब्दांचे ते काही । चालेल का ॥३१५॥
वर्णिता न येई ते शब्दानं । नच ऐकता येई कानानं । श्रवण आणि प्रवचन । असमर्थ तेथे ॥३१६॥
दैवगती कारणे । ते आत्मतत्त्व प्रकटणे । आपल्यासीच आपण अनुभवणे । ज्ञान अर्जुना ॥३१७॥
पुढे जाणीवही ती सरते । मग काहीच न उरते । वर्णणे आता तयाते । वायाचि अर्जुना ॥३१८॥
ऐसे चारी वाचांचे संपणे । जे मनाचेच विरणे । बुद्धि विचार तर्क संपणे । सूत्र अर्जुना ॥३१९॥
जे उन्मनियेचे लावण्य । नि तुर्येचे तारुण्य । तेच अनादि अगण्य । परतत्त्व अर्जुना ॥३२०॥
जे विश्वाचे मूळ । जे योगवृक्षाचे फळ । ते आनंद केवळ । चैतन्य गा ॥३२१॥
आकार गुणरहितता । मोक्षाची जी एकांतता । तेथे आदि आणि अंतता । विरोनी गेली ॥३२२॥
जे महाभूतांचे बीज । जे महातेजाचे तेज । ऐसे पार्था ते निज । स्वरूप माझे ॥३२३॥
भक्तासी त्रास होता । संपविण्या ती नास्तिकता । माझी ती चतुर्भुजता । प्रकटे अर्जुना ॥३२४॥
ते अनिर्वाच्य महासुख । पै आपणचि जाहले ते पुरुष । मग तयांचे निष्कर्ष । प्रमाण अर्जुना ॥३२५॥
आम्ही जो अनुभव सांगितला । तो अंतरी जयाने अनुभवला । तो आपोआप झाला । आम्हासारखा ॥३२६॥
परब्रह्मरस चाखता । प्रकटते देहमनी विशेषता । तयाची ती वार्ता । दिसे तेथे ॥३२७॥
ऐसी प्रतिती अंतरी प्रकटणे । तेच आपले विश्वात्मक होणे । तेव्हा अर्जुन म्हणे । सत्य देवा ॥३२८॥
आता देवा आपण । जे सांगितले साधन । तेथे ते आत्मज्ञान । सुलभ दिसे ॥३२९॥
ऐसे अभ्यास जे करती । ते ब्रह्मत्वा पावती । अध्यात्माची ही रीती । कळली मज ॥३३०॥
ऐस ज्ञान ते ऐकणे । बोध चित्ती उपजणे । मग ब्रह्ममय होणे । अंतरी देवा ॥३३१॥
तू जे काही सांगितले । ते मजसी समजले । आता तू लक्ष आपले । दे माझीया बोला ॥३३२॥
योगाची ती वार्ता । जी सांगितली तू आता । परि आवश्यक ती योग्यता । नाही मजसी ॥३३३॥
मी आता जसा आहे । तसाचि जर सिद्धि जाये । मग या योग उपाये । अभ्यासीन मी ॥३३४॥
अंगी योग्यता नसता । कैसी प्रकटेल ती ब्रह्ममयता । हाच तो प्रश्न आता । विचारी तुजला ॥३३५॥
शंका ती आहे मजला । म्हणून विचारतो तुजला । माझीया त्या प्रश्नाला । चित्त देई ॥३३६॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

अंगी योग्यतेविण । कैसे ब्रह्ममय ते होणं । का केवळ साधन करून । प्रकटे ब्रह्म ॥३३७॥
की योग्यता अंगी नसता । नच प्रकटते ती ब्रह्ममयता । तूच सांग आता । देवा मजसी ॥३३८॥
मग भगवंत म्हणाले । हे काय बोलणे झाले । निर्वाण का कधी प्रकटले । योग्यतेविण ॥३३९॥
होता ती ब्रह्म प्राप्तता । सिद्ध होते बा योग्यता । मनी तळमळ असता । ब्रह्मप्राप्ती ॥३४०॥
या अध्यात्माच्या बाबती । नाही भलत्याची बपौती । अंतरी जे योग्य असती । ते पात्र अर्जुना ॥३४१॥
अंतरी जाहले जे विरक्त । नसती मनइंद्रियासी आसक्त । अर्जुना पात्र तेच असतात । आत्मज्ञाना ॥३४२॥
ऐसी ती विरक्तता । मनइंद्रियासी अनासक्तता । तुजठायी ती प्रकटता । तू पात्र अर्जुना ॥३४३॥
जो नसे विरक्त । नि मनइंद्रियासी अनासक्त । तो कधीच पात्र नाही होत । या आत्मज्ञाना ॥३४४॥
जो असे जिभेच्या अधीन । वा निद्रेसी टाकला विकून । तो अपात्र जाण । या आत्मज्ञाना ॥३४५॥
जो अति हट्टी असतो । नि तहानभूक मारतो । जो इंद्रियांसी छळतो । तो अपात्र येथे ॥३४६॥
जो प्रयत्ने निद्रा टाळतो । नि हट्टाने मन मारतो । तो अपात्र ठरतो । या योगमार्गा ॥३४७॥
इंद्रियांची मनमानी करणे । वा जबरीने इंद्रिये आवरणे । या दोन्ही अती टाळणे । सूत्र अर्जुना ॥३४८॥
आहार तो उचित । असे तया माहीत । अवघ्या क्रिया असतात । सम्यक त्याच्या ॥३४९॥
तोलूनमापून बोलावे । नि सजग होऊनि चालावे । झोप येता झोपावे । ऐसी समज त्याची ॥३५०॥
जागणे जरी पडणे । परि करावे ते युक्तीने । मग त्रिदोषांचे संपणे । आपोआप ॥३५१॥
ऐसे युक्तीने वर्तता । मन इंद्रियासी ठेवून सम्यकता । मग वाढे संतोषता । आपोआप ॥३५२॥
युक्त आहारविहार असणे । आंत सुखाचे ते वाढणे । मग सहजचि योग घडणे । न अभ्यासिता ॥३५३॥
जैसे भाग्य उदया येता । उद्योगाचेनि निमित्ता । मग संपत्ति सन्मानता । नांदे तेथे ॥३५४॥
ऐसा जो युक्तिमंत । योगाभ्यासासी आचरत । असे मग तो पावत । आत्मसिद्धी ॥३५५॥
ऐसी समज येता । गाठ पडे आत्मतत्त्वा । मग त्या भाग्यवंता । मोक्ष घडे ॥३५६॥
योगयुक्त होता । तया आवडे एकांतता । प्रकटे ती अनासक्तता । मनी त्याच्या ॥३५७॥
जयाचे स्थिर झाले मन । त्यासीच तू योगयुक्त म्हण । जसे निर्वाती ज्योतीचं असणं । निष्कंप अर्जुना ॥३५८॥
तुझे मनोगत जाणून । आता मी जे तुज सांगेन । ते तू लक्ष देऊन । ऐकावे अर्जुना ॥३५९॥
तुज प्राप्तीची इच्छा आहे । परि अभ्यासी तू दक्ष नोहे । सांग पां का बिहे । योगास तू ॥३६०॥
हे पहा अर्जुना । नको भीक घालू या मना । समजून घेऊन या दुर्जना । दूर ठेवी ॥३६१॥
पहा आयुष्य ते वाढवते । नि मरण ते टाळते । परि वैरी त्या औषधाते । म्हणे जिव्हा ॥३६२॥
ऐसे हितासी जे जे निके । ते सदाचि या इंद्रिया दुखे । एरवी सोपे योगासारखे । काही आहे ॥३६३॥
मी सांगितले महत्त्व योगाचं । धारणा ध्यान समाधीचं । होईल बघ तयानेच । निरोध इंद्रियांचा ॥३६४॥
एरवी तरी अर्जुना । मुरड घालता इंद्रिय प्रवृत्तींना । मगच आपली आपणा । गाठ पडे ॥३६५॥
मन इंद्रिये अंतर्मुख होती । मग आपणासीच देखती । ओळख तेव्हा होते ती । आपली आपणा ॥३६६॥
मन अंतर्मुख होता । मनी शांतता प्रकटता । मनाचे मनपण विरता । ज्ञान होते ॥३६७॥
मनाचे मनपण विरता । इंद्रियांशी तादात्म्य तुटता । जाणते ती आत्मसत्ता । स्वत: स्वत:सी ॥३६८॥
ऐसे स्वत:सी जाणता । होतसे दु:खाची सांगता । डोंगरा एवढे दु:ख आता । न हालवे तया ॥३६९॥
देह शस्त्राने तोडता । वा अग्नीतही पडता । तयाच्या चित्ताची शांतता । नच भंगे ॥३७०॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐसे आपणासी जाणता । देह मनासी तादात्म्य तुटता । आत्मतत्त्वी एकत्व पावता । घडे योग ॥३७१॥
योग तो घडता । सरते भवचक्राची आसक्तता । ऐसी ती आत्मसत्ता । विलक्षण अर्जुना ॥३७२॥
ऐसी अनुभूती येता । प्रकटते ती आत्मतृप्तता । ज्ञान ते प्राप्त होता । मोक्ष घडे ॥३७३॥
मनोभ्रमांचे द्वैत संपणे । अद्वैत अंतरी प्रकटणे । स्वयेचि ती आत्मसत्ता होणे । योग अर्जुना ॥३७४॥
मनीचे सर्व संकल्प संपता । मन इच्छांची सांगता होता । मनाचे मनपण विरता । ज्ञान होई ॥३७५॥
मन इंद्रियांची व्यर्थता जाणता । विषयांची संपे आसक्तता । मग विषय ते संपता । संपे विषयी ॥३७६॥
ऐसे मनोसंकल्प संपता । मनी प्रकटते वैराग्यता । मगच ती आत्मसत्ता । अनुभवा येई ॥३७७॥
बुद्धीचे बुद्धीपण विरणे । मनाचे मनपण संपणे । मन इंद्रियांपलीकडे जाणे । ते सूत्र अर्जुना ॥३७८॥
एकाग्रता जर वाटे तुज कठीण । त्यासाठी एक मार्ग सांगीन । लक्ष ते देऊन । ऐक अर्जुना ॥३७९॥
अभ्यासी ते बसावे । श्वासासी लक्ष द्यावे । येणे जाणे ते पहावे । श्वासाचे अर्जुना ॥३८०॥
ऐसे श्वासासी पहाता । साधते ती मन एकाग्रता । मन एकाग्रता साधता । कल्याण अर्जुना ॥३८१॥
घडता ऐसे पहाणे । अनुभवा येईल मनाचे भटकणे । परि पुन्हा मनासी आणणे । श्वासापासी ॥३८२॥
ऐसे मन ते स्थिर होता । मनाची वळवळ संपता । मग ती अद्वैतता । अनुभवा येई ॥३८३॥
अद्वैत ते प्रकटता । मग तूच ती आत्मसत्ता । विश्वासी ती एकरूपता । अनुभवा येई ॥३८४॥
जसे अभ्र ते विरता । केवळ आकाश ते उरता । मग आकाशाचीच सत्ता । चहूकडे ॥३८५॥
तैसे चित्त लया जाते । मग चैतन्यचि उरते । मग प्रचीती येते । बा त्या चैतन्याची ॥३८६॥
मनाचे संकल्प संपणे । मनइच्छांची सांगता होणे । इंद्रियासी तादात्म्य तुटणे । सूत्र अर्जुना ॥३८७॥
मनइंद्रियांसी तादात्म्य तुटणे । मग परब्रह्मासी एक होणे । जसे मिठाचे ते विरघळणे । जळामाजी ॥३८८॥
ऐसा तो मेळ होता । प्रकटते ती विश्व एकात्मता । मग मी-पणाची कथा । सरुनी जाये ॥३८९॥
ऐसे हे आपुल्या पायाने । आपल्याच पाठीवर चालणे । हेही जर तू नेणे । मग ऐक अर्जुना ॥३९०॥
मीच असे सकळ देही । यात संशयो नाही । सर्व विश्व ममठायी । हे सत्य अर्जुना ॥३९१॥
मी आणि हे विश्व । परस्पर आम्ही एकजीव । परि तयाची ती जाणीव । फक्त ज्ञान्या ॥३९२॥
जो मनइंद्रियातून सुटला । तोच मजसी पावला । बोध तयासीच झाला । अद्वैताचा ॥३९३॥
भुतांचे जे भासे भिन्नपण । ते भ्रमाच्याच कारण । संपता मनाचे भ्रमपण । ज्ञान अर्जुना ॥३९४॥
मग मीच विश्व म्हणणे । ते वायाचि गा बोलणे । न बोलताही ते असणे । एकत्व तेथे ॥३९५॥
दीप आणि प्रकाश । तेथे एकत्वाचा वास । तैसे मी आणि विश्वाभास । एक अर्जुना ॥३९६॥
जैसे उदक आणि रस । वा गगन आणि अवकाश । तैसे विश्वाचा तो भास । माझेच ठायी ॥३९७॥
मी असे जगी वसत । आणि जग असे माझ्यात । जैसे वस्त्र आणि सूत । भिन्न नाही ॥३९८॥
दिसती नाना अलंकार । परि तेथे एक सोन्याचाच वावर । तैसे मी आणि चराचर । अभिन्न अर्जुना ॥३९९॥
एकाच वृक्षा ठिकाणी । जशी अगणित पानांची उगवणी । तसे माझ्याच ठिकाणी । प्रकटन विश्वाचे ॥४००॥
ऐसे अनुभवून अंत:करणात । जो एकत्व पावला आत्मतत्त्वात । मग तो पंचमहाभूतात । अडकेच ना ॥४०१॥
ऐसी माझी व्यापकता । अंतरी ती अनुभवता । मग न करताही वाच्यता । एकीच तेथे ॥४०२॥
आता असूनही शरीरात । नाहीच शरीरी आसक्त । ऐसा जो देहमनातीत । तो योगी अर्जुना ॥४०३॥
ऐसे प्रकटता ज्ञान । विश्वासी एकत्व जाणून । मग चराचरासी एक होऊन । नांदे येथे ॥४०४॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

आता सुखदु:ख संवेदना । वा शुभाशुभ कल्पना । सम राहती तयाच्या मना । सर्वकाळ ॥४०५॥
सम विषम भाव । राग द्वेषाचे गाव । आणि द्वंद्वाचे ते नाव । नाही तेथे ॥४०६॥
हे एकेक काय सांगावे । तया तिन्हीलोक आघवे । मी ऐसे स्वभावे । बोधा आले ॥४०७॥
लोक त्यासी देह मानती । तया सुखदु:खही होते म्हणती । परि तो परब्रह्माची मूर्ती । आम्हासाठी ॥४०८॥
ऐसे आपणचि विश्व व्हावे । नि आपुल्या ठिकाणी विश्व पहावे । ऐसी अनुभूती जो पावे । तो ज्ञानी अर्जुना ॥४०९॥
ऐसा किती वेळा वारंवार । अर्जुना करू मी उच्चार । एकरूपतेचे हे सार । उमजूनी घेई ॥४१०॥

अर्जुन उवाच

मग म्हणे तो अर्जुन । देवा तूच सांग समजावून । माझे का हे चंचल मन । कधी शांत होई ॥४११॥
हे मन कैसे केवढे । पाहू जाता ते न सापडे । एन्हवी त्रैलोक्यही थोकडे । भटकण्या तया ॥४१२॥
म्हणून हे कैसे घडेल । माकडा का समाधी लागेल । का चूप म्हणता चूप राहील । मन कधी ॥४१३॥
जे बुद्धीसी जिंकते । नि निश्चयासी मारते । धैर्यासही पहा घाबरवते । हे मन देवा ॥४१४॥
जे विवेका भुलवते । संतोषाची वाट लावते । बैसले तरी हिंडविते । दाही दिशा ॥४१५॥
निरोधता जे उसळते । नि संयम करू जाता बहकते । ऐसे भयंकर मन ते । बदलेल का कधी ॥४१६॥
ऐसे मन निश्चल होणे । आणि ज्ञान ते प्रकटणे । नाहीच बा ते घडणे । कधी देवा ॥४१७॥

श्री भगवानुवाच

मग म्हणाला भगवंत । सत्यच असे तू सांगत । हे मन होणे शांत । नाही सोपे ॥४१८॥
पण वैराग्याचे फाटक लावता । नि अभ्यासाचे कुंपण घालता । धारणेचे कुलूप लावता । ते स्थिर होई ॥४१९॥
मनासी ज्याची गोडी । तिकडेच ते ओढी । ओळखून ही मनाची नाडी । लावावे वळण ॥४२०॥
जया मनी नसे विरक्ती । ते स्थिर न होऊ शकती । तेथे समाधि ती । प्रकटेच ना ॥४२१॥
यम नियम न पाळणे । मनी वैराग्य नसणे । विषयी आसक्त असणे । दुर्दैवच अर्जुना ॥४२२॥
मग ऐसे ते मन । स्थिर कैसे ते होईन । आणि मग तेथे आत्मज्ञान । प्रकटेल कैसे ॥४२३॥
म्हणून मनाचा निग्रह करणे । तैसा उपाय तो योजणे । तेच अभ्यासाचे आरंभणे । जाण अर्जुना ॥४२४॥
हे योगसाधन जितुके । ते नाहीच बा लटिके । परि तळमळीचेनि ठाके । सर्व साध्य ॥४२५॥
शब्दातीत या योगाचे बळ । मन असो कितीही चपळ । प्राप्त होणे परब्रह्म सकळ । अशक्य नाही ॥४२६॥
मग म्हणे अर्जुन । देवा सत्य तुझं बोलणं । हे अष्टांगिक साधन । अलौकिक देवा ॥४२७॥
या योगाची खबरबात । नव्हतोच मी जाणत । म्हणून मनासी होतो समजत । चंचल देवा ॥४२८॥
अनंत जन्मानंतर आम्हाला । हा योग आज समजला । नव्हताच कधी ऐकला । योग आम्ही ॥४२९॥
परि संशय एक अजुनी । भगवंता आहेच माझे मनी । तो फेडण्या तुजवाचूनी । कोण समर्थ ॥४३०॥
भगवंता एक कोणी । मोक्षापाठी लागला होता झटूनि । केवळ श्रद्धेच्या अंगानी । उपायेवीण ॥४३१॥
इंद्रियासी विरक्त झाला । श्रद्धेचिया वाटे चालला । त्या आत्मसिद्धिचिया गावाला । पोहाचावया ॥४३२॥
न झाले होते प्राप्त ज्ञान । लौकिकही गेले होते सोडून । आणि आले तयासी मरण । त्या आधी ॥४३३॥
जसे अकाली आभाळ । अत्यंत जे विरळ । आलाच नव्हता वर्षाकाळ । जैसा देवा ॥४३४॥
तैसे दोन्ही दुरावले । लौकिक अलौकिक दोन्ही गेले । तयाचे काय झाले । सांगा देवा ॥४३५॥
दोहोसी जो अंतरला । श्रद्धा धरूनच मेला । तयाच्या त्या गतीला । सांगा देवा ॥४३६॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

तव कृष्ण म्हणती पार्था । जया मनी असे मोक्ष आस्था । तया मोक्षावाचुनि अन्यथा । गती नाही ॥४३७॥
ऐसे जरी भासे । परि तो मोक्षाचाच पांथिक असे । भाग्य ते ऐसे । देवा नाही ॥४३८॥
जर जास्त अभ्यास करता । पाऊले वेगात चालता । मग मोक्षासी तो पावता । मृत्यूपूर्वी ॥४३९॥
जरी तेवढा वेग नव्हता । म्हणून घडली मुक्कामता । परि तयाची ती मोक्षता । अखंडित ॥४४०॥
शेकडो यज्ञ करून । प्राप्त होते जे ज्ञान । ते यास प्राप्त होणं । अनायासे ॥४४१॥
मग तेथीचे असाधारण । भोग ते भोगून । कंटाळून मग जाऊन । मोक्ष मागे ॥४४२॥
भोगासी विघ्न मानून । मनी पश्चात्ताप करून । मनी सजग होऊन । साधना करी ॥४४३॥
पाठी जन्मे संसारी । सकळ धर्माचिया माहेरी । पूर्वजन्माची ती तयारी । सोबत त्याचे ॥४४४॥
जेथे असे नीतीने चालणे । नि सत्यचि बोलणे । तेथे तयाचा जन्म होणे । धार्मिक घरी ॥४४५॥
तेथे असे धर्माची शिकवण । नि सत्य ते आचरण । विवेकपूर्ण असणं । स्वभाव त्यांचा ॥४४६॥
चाले तेथे ईश्वर चिंतन । नि ज्ञानाची आठवण । तेथे तयाचं जन्मणं । घडे अर्जुना ॥४४७॥
ऐसे पूर्वपुण्याकारण । मोक्ष इच्छा मनी घेऊन । होई जयाचं जन्मणं । तो योगभ्रष्ट ॥४४८॥
जेथे उपलब्ध असे ज्ञान । चाले उपनिषदांचे पठण । योगाचे ते साधन । तेथे असे ॥४४९॥
जेथे सिद्धांतांची जाण । जयाचे विरक्त ते मन । मोक्षाची ती खाण । त्यांच्या घरी ॥४५०॥
जेथे विवेकानं वागणं । नि चर्चा ब्रह्मज्ञान । त्या घरात जन्मणं । घडे त्याचे ॥४५१॥
मग देह होता धारण । तया आत्मज्ञानाची तहान । मग प्राप्त तया ज्ञान । अनायासे ॥४५२॥
तसे वयाची वाट न पहाता । प्राप्त होण्यापूर्वी प्रौढता । बालपणीच ती सर्वज्ञता । वरी तयाते ॥४५३॥
मग सिद्ध प्रज्ञेच्या कारणे । मनी ते ज्ञान प्रकटणे । सकल शास्त्रांचे उमजणे । तेथे घडे ॥४५४॥
ऐशा जन्माची इच्छा घेऊन । देवही करती साधन । जप-तप होमहवन । करती ते ॥४५५॥
देवही ते भाट होती । मृत्युलोकांची स्तुती करती । ऐसी त्याच्या जन्माची महती । आहे अर्जुना ॥४५६॥
मागील सद्‌बुद्धीकारणे । तयाचे ते शुद्ध असणे । मग आत्मज्ञान होणे । आपोआप ॥४५७॥
आधीच तो पायाळू भाग्यवान । आणि प्राप्त झाले दिव्यांजन । मग तया पाताळ धन । सहजप्राप्त ॥४५८॥
तैसे अतिकठीण जे ज्ञान । तयासी त्वरित होते ते आकलन । मग तयाचे मन । संपून जाई ॥४५९॥
इंद्रिये शरण येती मना । मन एकवटे पवना । पवन सहजे गगना । मिळोनि जाये ॥४६०॥
ऐसे कैसे हे घडणे । तया सहज ज्ञान प्राप्त होणे । समाधीचे घरी येणे । शोधीत तया ॥४६१॥
योगपीठाचा भैरव । आत्मविद्येचा गौरव । नि वैराग्याचा अनुभव । अवतरला तेथे ॥४६२॥
हा विश्वाचे मोजमाप । अष्टांगयोगाचा द्वीप । जसे सुवासाने घ्यावे रूप । चंदनाचे ॥४६३॥
जसा प्रत्यक्ष संतोष अवतरला । सिद्धींनी परिपूर्ण झाला । मग आत्मज्ञान तयाला । सहज प्राप्त ॥४६४॥
अनंत जन्म घेता । पुण्यसंचय करता । होतसे आत्मज्ञान प्राप्यता । तेव्हा अर्जुना ॥४६५॥
आघवी ती साधन जात । असे तयाच्या आवाक्यात । म्हणून ज्ञान सहज प्राप्त । तया अर्जुना ॥४६६॥
ऐसे विवेकाकारणे । मनो विचारांचे थांबणे । मग समाधीचे प्रकटणे । त्याचे मनी ॥४६७॥
तेथ मनाचे सकंल्प विरे । वायूचे वायुपण सरे । आपणपा आपण मुरे । आकाशही ॥४६८॥
प्रणवाचा माथा बुडे । अनिर्वाच्य सुख जोडे । शब्दांच्या त्या पलीकडे । ती अनुभूती ॥४६९॥
ऐसी ती ब्रह्मस्थिती । जेथून सर्वांची उत्पत्ती । तो अमूर्ताची मूर्ती । होऊनी ठाके ॥४७०॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

अनेक जन्म मागले । इच्छांचे जंजाळ सोडले । म्हणून ते प्रकटले । ब्रह्म आता ॥४७१॥
इंद्रियांशी तादात्म्य तुटता । प्रकटली ती ब्रह्ममयता । जैसे अभ्र ते विरता । प्रकटे गगन ॥४७२॥
विश्व जेथून प्रकटते । नि जेथे ते लया जाते । ऐसे मूळ चैतन्य ते । तोचि झाला ॥४७३॥
ब्रह्मप्राप्तीच्या आशेनं । मनी धैर्य ते धरून । षट्कर्म ते आचरून । कर्म करी ॥४७४॥
ब्रह्मप्राप्तीलागून । ज्ञानाचे कवच घालून । प्रपंच समरांगणी लढून । युद्ध करी ॥४७५॥
जो अत्यंत निसरडा । असा तपोदुर्गाचा कडा । तयाचिया चाडा । झोंबे तो ॥४७६॥
भक्तांचा जो विषय । नि यज्ञांचा आशय । साधकांना जे पूजनीय । ते तोच हाही ॥४७७॥
तेचि ब्रह्म होऊन । स्वये जाहला निर्वाण । जे साधकांचे कारण । सिद्ध तत्त्व ॥४७८॥
कर्मयोगी ज्या करती वंदन । जे ज्ञानीयांचे ज्ञान । साधकांसी जे कारण । साधनेचे ॥४७९॥
आपल्याच आंतरमनी । ब्रह्ममयता अनुभवूनी । शरीरधारी असुनी । तो ब्रह्म झाला ॥४८०॥
म्हणून या कारणे । तुला मी सदा म्हणे । योगी होय अंत:करणे । तू अर्जुना ॥४८१॥
अगा योगी जो म्हणीजे । तो देवांचा देव जाणीजे । आणि सुख सर्वस्व माझे । चैतन्य तो ॥४८२॥
जयासाठी भजन भजावे । हे योग साधन जे आघवे । ते मीचि जाहले अनुभवे । अखंडित ॥४८३॥
मग आमची जी प्रीत । असे ती शब्दातीत । शब्दाच्या त्या सीमेत । न येणे प्रीतीचे ॥४८४॥
ऐशा या प्रेमा । जर द्यायची झाली उपमा । तर मी देह तो आत्मा । हेचि होय ॥४८५॥
चकोराचा प्राणचंद्र । तैसा त्रिभुवनाचा नरेंद्र । समस्त गुणांचा समुद्र । भगवंत जो ॥४८६॥
आधीपासून अर्जुना आवडे निरूपण । ती आवड वाढली दुपटीनं । हे जाणून तो भगवान । संतोषला ॥४८७॥
उपदेश अर्जुना उमजला । त्या बोलाचा आरसाच केला । आनंद भगवंता जाहला । अपार ॥४८८॥
ज्ञान प्रसंग आता येईल । ज्ञान जेथे प्रकटेल । आता पहा अंकुरेल । ज्ञानबीज ॥४८९॥
होईल वर्षा सत्त्व गुणाची । ढेकळे विरतील वासनेची । तयारी ती पेरणीची । झाली आता ॥४९०॥
त्या अवधान वाफसी । संधी सोनिया जैसी । म्हणून बीज पेरावयासी । श्रीनिवृत्ती तयार ॥४९१॥
मग सांगितले ज्ञानदेवांनी । उपकार केले सद्गुरुंनी । मस्तकी हात ठेवूनी । दिधले ज्ञान ॥४९२॥
हृदयी दाविले जे संतानी । तेच बोलेल ही वाणी । मग म्हटले श्रीनिवृत्तींनी । पुरे आता ॥४९३॥
मनाचे कान करून ऐकावे । बुद्धीच्या डोळ्याने पहावे । आणि चित्तास विरू द्यावे । आता तुम्ही ॥४९४॥
अवधानाचे करून साधन । अंतरंगी त्या प्रवेशून । अनुभवावे हे ज्ञान । अंतरंगी आता ॥४९५॥
या अवधाने स्वहित होईल । जीवा निवांतपणा येईल । जेधवा ब्रह्म ते प्रकटेल । अंतरी अर्जुना ॥४९६॥
आता जे निरूपण । करेल तो भगवान । ते निवृत्तिदास ओवीतून । सांगेल तुम्हा ॥४९७॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे आत्मसंयमयोगोनाम षष्ठोऽध्याय: ॥६॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट । वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वार्‌यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणार्‌या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधू नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु हृदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पांडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे हृदगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com
ई-साहित्य प्रतिष्ठान®
www.esahity.com

श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळ्यांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात. (दूरभाष : ९८२२९९२५७८)

ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९६७४८२०